# निर्माती

निर्माती

नऊरात्रीचे नऊ दिवस
करतोस देवीची पूजा
पण घरामधल्या देवीची
का रे करतोस वाणवा ?

जन्म दिला जिने तुला
ती जननी तुझी
पांग तिचे सांग कसे
फेडशील या जन्मी ?

स्वतःचे नाव तुझ्याशी जोडते
ती सहचारिणी तुझी
सर्वस्व तिने अर्पिले तुला
किती रे लाज तिची तू ठेविली ?

स्वतःमधला अर्धा हिस्सा
तुझ्यासाठी जी ठेविते
बहिण तुझी रे ती
तिला कसे तू विसरावे ?

तुझ्या घरी जन्म घेतला
भाग्य कन्यादानाचे दिले
लेक तुझी रे ती लाडकी
मातेच्या उदरीच तिला का खुडले ?

या देवींची पूजा करिता
जन्माची होई उतराई
आई, ताई, पत्नी, मुलगी
यामध्येच गवसेल तुजला निर्माती...

प्रतिक्षा...